# प्रकरण पहिले

## महानुभाव संप्रदाय व वाङ्मय निर्मिती

# प्रकरण पहिले

## महानुभाव संप्रदाय व वाङ्.मय निर्मिती

प्राचीन मराठी वाङ्.मयात महानुभावीय वाङ्.मयाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. ज्या काळात हा संप्रदाय निर्माण झाला, तो काळ मराठी साहित्याचा प्रारंभावस्थेचा काळ होता. लेखनाबाबत अथवा इतर साहित्य निर्मितीबाबत म्हणावी तशी अनुकूल परिस्थिती नव्हती. अशा अवस्थेत महानुभावीय वाङ्.मय निर्माण झाले. त्यामुळेच या वाङ्.मयाबद्दल अभ्यासकांत आकर्षण आढळते.

या वाङ्.मयाचे स्वरूप समजावून घेणे, तसेच प्राचीन काळातील ही निर्मितीची प्रक्रिया कशी घडली ? कोणते घटक कारणीभूत ठरले ? त्यांतून समाजजीवनाचे स्वरूप कसे रेखाटले गेले ? असे विविध प्रश्न निर्माण होतात. त्या संदर्भात सखोल अभ्यास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच जाणिवेतून "स्मृतिस्थळ" व "दृष्टांतपाठ" या दोन महानुभावीय ग्रंथांची निवड या शोधनिबंधासाठी केलेली आहे. त्यांच्या अंतर्गत स्वरूपाकडे वळण्यापूर्वी या ग्रंथाच्या निर्मितीचे स्वरूप समजावून घेणे योग्य ठरेल.

### १) महानुभाव संप्रदायाची निर्मिती:

१२व्या शतकात या संप्रदायाची निर्मिती झाली. त्या निर्मिती मागे विविध कारणे आढळून येतात. अभ्यासकांनी या काळातील विषम समाजरचना व यादवांची राजवट अधिक महत्त्वपूर्ण मानलेली आहे. त्याबरोबरच श्री. चक्रधरस्वामींचे अलौकीक व्यक्तिमत्त्व या संप्रदायाच्या निर्मितीस कारणीभूत ठरलेले आहे. या संप्रदायाच्या निर्मितीबाबत ह.श्री. शेणोलीकरांनी[१] पुढीलप्रमाणे चिकित्सा केली आहे. ते म्हणतात, "महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधरस्वामी यांच्यावेळी महाराष्ट्रात देवगिरीच्या यादव राजाची कारकीर्द

# प्रकरण पहिले

## महानुभाव संप्रदाय व वाङ्.मय निर्मिती

प्राचीन मराठी वाङ्.मयात महानुभावीय वाङ्.मयाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. ज्या काळात हा संप्रदाय निर्माण झाला, तो काळ मराठी साहित्याचा प्रारंभावस्थेचा काळ होता. लेखनाबाबत अथवा इतर साहित्य निर्मितीबाबत म्हणावी तशी अनुकूल परिस्थिती नव्हती. अशा अवस्थेत महानुभावीय वाङ्.मय निर्माण झाले. त्यामुळेच या वाङ्.मयाबद्दल अभ्यासकांत आकर्षण आढळते.

या वाङ्.मयाचे स्वरूप समजावून घेणे, तसेच प्राचीन काळातील ही निर्मितीची प्रक्रिया कशी घडली ? कोणते घटक कारणीभूत ठरले ? त्यांतून समाजजीवनाचे स्वरूप कसे रेखाटले गेले ? असे विविध प्रश्न निर्माण होतात. त्या संदर्भात सखोल अभ्यास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच जाणिवेतून "स्मृतिस्थळ" व "दृष्टांतपाठ" या दोन महानुभावीय ग्रंथांची निवड या शोधनिबंधासाठी केलेली आहे. त्यांच्या अंतर्गत स्वरूपाकडे वळण्यापूर्वी या पंथाच्या निर्मितीचे स्वरूप समजावून घेणे योग्य ठरेल.

### १) महानुभाव संप्रदायाची निर्मिती:

१२व्या शतकात या संप्रदायाची निर्मिती झाली. त्या निर्मिती मागे विविध कारणे आढळून येतात. अभ्यासकांनी या काळातील विषम समाजरचना व यादवांची राजवट अधिक महत्त्वपूर्ण मानलेली आहे. त्याबरोबरच श्री. चक्रधरस्वामींचे अलौकिक व्यक्तिमत्त्व या संप्रदायाच्या निर्मितीस कारणीभूत ठरलेले आहे. या संप्रदायाच्या निर्मितीबाबत ह.श्री. शेणोलीकरांनी[१] पुढीलप्रमाणे चिकित्सा केली आहे. ते म्हणतात, "महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधरस्वामी यांच्यावेळी महाराष्ट्रात देवगिरीच्या यादव राजाची कारकीर्द

सुरु होती. हे यादव राजे वैदिक संस्कृतीचे व विद्या-कला यांचे पुरस्कर्ते होते. कृष्णदेवाने आपल्या कारकिर्दीत अनेक यज्ञ-याग केले. रामदेवरावाने काशीत विष्णूचे सुवर्णमंदिर बांधले. आपल्या राज्यातही अनेक मंदिरे उभारली. वैदिक भागवत, इत्यादी धर्मपंथांना त्यांनी चांगला राजाश्रय दिला. त्यामुळे यादवांची राजवट वाङ्मयदृष्ट्या मोठी भरभराटीची होऊन गेली. ज्योतिष, संगीत, वेदांत-धर्मशास्त्र, व्याकरण, वैद्यक इत्यादी शास्त्रांवर संस्कृत भाषेत अनेक ग्रंथ झाले. परंतु संस्कृत न येणाऱ्या असंख्य लोकांच्यादृष्टीने हे ग्रंथभांडार असून नसल्यासारखेच होते. त्याचा प्रसार मर्यादित असल्याने तत्कालीन लोकजीवनाला हे वाङ्मय वळण लावू शकले नाही. म्हणून श्री चक्रधर, ज्ञानेश्वर, यांनी लोकभाषेचा पुरस्कार केला. राजाश्रयाच्या या स्थितीबरोबरच तत्कालीन सामाजिक परिस्थिती या पंथाच्या निर्मितीस कारणीभूत ठरल्याचे प्रा. शेणोलीकरांनी नमूद केले आहे.

महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अभ्यास करणारे अभ्यासक पु.ग. सहस्त्रबुद्धे[२] यांनी या काळातील विषम समाज-रचना कशी निर्माण झाली याची चिकित्सा केली आहे. या काळातील यादवांच्या नेतृत्वाचा विचार करताना ते लिहितात. "यादव काळाच्या उत्तरार्धात या समाजाची जीवनशक्तीच नष्ट झाली होती." या अध:पाताची त्यांनी वेगवेगळी कारणे सांगितली आहेत. उदा. निवृत्ती, संन्यासवादाला महत्त्व, त्यामुळे राजधर्म, व्यापार यांची हेळसांड झाली. कलियुगाची घातकी कल्पना व तज्जन्य प्रारब्धवाद निर्माण झाला. शूद्राबद्दल उदार धोरण लोप पावून वर्णभेद, जातिभेद अस्पृश्यता या विषमतेला तीव्र स्वरूप प्राप्त झाले. अशा विविध कारणांमुळे यादवांच्या काळात विषम समाज-रचना होती. त्यामुळे सर्वसामान्यांचा समाज दिशाहीन बनला होता. या समाजाला योग्य दिशा व नेतृत्त्व देण्याची गरज निर्माण झाली होती. ती गरज पूर्ण करण्याचे कार्य श्री चक्रधरस्वामी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

यांनी केले. "अवघा जनु ठकला असे: परि मी ठकला ऐसे कवणी ना म्हणे" हे श्रीचक्रधरांचे उद्गार या संदर्भात आवर्जुन लक्षात घेतले पाहिजेत. त्यामुळे महानुभाव संप्रदायाच्या निर्मितीत व स्थापनेत मानाचे स्थान दिले जाते. पंथाचे प्रवर्तक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो.

महानुभाव संप्रदयास यादवांची राजवट जशी कारणीभूत झालेली आहे, तसेच चक्रधरांचे कर्तृत्वही उपकारक ठरलेले आहे. एक पंथ संस्थापक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व समजावून घेणे येथे महत्त्वाचे ठरते.

## २) सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी:

पंथाचे संस्थापक म्हणून सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामीकडे श्रेय जाते. अवतारी पुरुष म्हणूनच पंथातील लोक त्यांच्याकडे पहातात. त्यांच्या अवतारी चरित्रा-बद्दल शं.गो. तुळपुळे[3] यांनी थोडक्यात पुढीलप्रमाणे पण अचूक असे विवेचन केले आहे. "श्री चक्रधरस्वामी हे इ.स. १२ व्या शतकात गुजरातेत अवताररुपाने अवतरले. ते मूळचे भरवस (म्ह. भडोच) येथील विशालदेव नामक प्रधानाचे पुत्र असून त्यांचे त्या जन्मातील नाव हरिपाळदेव असे होते. या हरिपाळ देवाच्या मृत शरीरात द्वारावती (म्ह.द्वारका) येथील श्री चक्रपाणी नावाच्या ईश्वरावताराने प्रवेश करुन तो देह स्विकारला तेव्हा जिवंत झालेला हरिपाळदेव हा देहाने हरिपाळदेवच राहिला. तरी त्याची वृत्ती पार बदलून गेली. लौकरच काही एका प्रसंगाने उद्विग्न होऊन त्याने गृहत्याग केला. तेव्हा-पासून वैराग्य धारण करुन ते एकाकी वृत्तीने भ्रमंती करीत राहू लागले. पुढे योगायोगाने त्यांची व-हाडातील रिधपूर येथील अवतारी पुरुष श्री गोविंदप्रभू यांची भेट झाली.

श्री गोविंदप्रभूंकडून शक्तिस्वीकार करुन आपल्या अवतारी जीवनास त्यांनी प्रारंभ केला. या प्रसंगाने हरिपाळदेवाचा चक्रधर झाले व त्यांचे

पूर्वायुष्य पुसले जाऊन ते एक अवतारी पुरुष म्हणून ओळखले जाऊ लागले. येथपासून तो प्रयाणापर्यंत चक्रधरांच्या आयुष्याचे दोन ठळक कालखंड पडतात. पहिला "एकांक" या काळात ते एकाकी होते. अद्यून भक्तपरिवार भोवती गोळा झाला नव्हता. या कालखंडाची समाप्ती त्यांनी पैठण येथे येऊन नागांबिका किंवा नागाइसा या नावाच्या विदुषीला प्रेमदान केले, त्या प्रसंगाने होते. येथून त्यांच्या आयुष्याचा "पूर्वार्ध" व नंतर चार वर्षांनी नागदेवांना दीक्षा दिली, त्या प्रसंगाने "उत्तरार्ध" सुरु होतो. या आठ वर्षांच्या कालावधीत त्यांनी व-हाड, खानदेश व मराठवाडा, नाशिक या महाराष्ट्राच्या भागात होडोपाडी संचार करुन आपले तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेला निरूपणाने समजावून सांगितले. अशारितीने आयुष्याचे अखेरचे दिवस लोककल्याण साधण्यात वेचून श्री चक्रधरांनी शाके ११९६ मध्ये "उत्तरापंथे गमन" केले.

डॉ. तुळपुळे यांनी चक्रधरांच्या जीवनाचा अत्यंत अल्प स्वरूपात येथे विचार केलेला आहे. लीळाचरित्राचे संपादक डॉ. वि. भि. कोलते[4] यांनी चक्रधरांच्या संपूर्ण जीवनक्रमाचा सूक्ष्मतेने मागोवा घेऊन त्यांच्या जीवनाचे तपशीलवार वर्णन लीळाचरित्राच्या प्रस्तावनेत दिले आहे. चक्रधरांच्या जीवनचरित्राचा येथे मागोवा घेणे हा उद्देश नाही. पण त्यांच्या जीवन चरित्राबद्दल जी विभिन्न मते आढळतात ती विचारात घेणे संयुक्तिक ठरते. विशेषतः रा.चिं. ढेरे [5] यांनी "चक्रपाणि" या त्यांच्या ग्रंथात चक्रधरांच्या जीवन-स्वरूपावर अधिक व्यापक स्वरूपात विचार मांडलेले आहे. त्यांच्या मते "त्यांच्या "एकांका" च्या अवस्थेतील बारा वर्षांचा काळ हा चक्रधरांनी कर्नाटकातील श्री पर्वतावर व्यतीत केला." डॉ. ढेरे यांनी अशा वेगळ्या स्वरूपातून चक्रधरांच्या व्यापकतेचे स्वरूप अभिव्यक्त केले आहे. डॉ. ढेरे यांच्या विधानावर वाद होतील पण श्रीपर्वत नाथसंप्रदाय यांच्याशी चक्रधर स्वामींचा घनिष्ठ संबंध आला होता हे लीळाचरित्रातील

अनेक लीळामधून दिसून येते. एक पंथ संस्थापक व अवतारी पुरुष म्हणून येथे चक्रधर स्वामींच्या जीवनचरित्राची थोडक्यात दखल घेतली आहे.

३) पंचकृष्णांची परंपरा:

पंथाचे संस्थापक म्हणून सर्वज्ञ चक्रधरस्वामी ओळखले जात असले तरी महानुभावपंथात त्यांच्याकडे कृष्णावतार म्हणूनही पाहिले जाते. याच स्वरूपातून महानुभावी पंचकृष्णांची परंपरा आपणांपुढे उभी राहते. ते पंचकृष्ण पुढीलप्रमाणे: १) श्रीकृष्ण, २) श्रीदत्तात्रेयप्रभू, ३) श्री चांगदेव राऊळ, ४) श्री गुंडम राऊळ (श्री गोविंदप्रभू), ५) श्री चक्रधरस्वामी या पाच अवतारांना "पंचकृष्ण" अशी संज्ञा असून ते नित्य स्मरणीय आहेत. त्यातसुध्दा श्री चक्रधरांचा अवतार सर्व श्रेष्ठ मानला जातो. पंचकृष्णांच्या या परंपरेला विभूती महत्त्वही म्हणता येते. पंथातील लोक श्रध्देने या पंचकृष्णांच्या परंपरेस मानतात.

४) पंथाचे तत्त्वज्ञान व आचारधर्म:

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हा संप्रदाय द्वैती मताचा आहे. अद्वैती शंकराचार्य "सत्य" असा एकच पदार्थ मानतात. तो म्हणजे "ब्रह्म्". सांख्य पुरुष आणि प्रकृती हे दोन मूलपदार्थ म्हणून ते द्वैती. त्याचप्रमाणे चक्रधरही द्वैती आहेत. कारण जीव,देवता, प्रपंच व परमेश्वर अशा चार वस्तू ते स्वतंत्र व नित्य (अनादी - अनंत) मानतात. कार्यरूप प्रपंच जड, अनित्य असल्याने व देवता नित्यबध्द असल्याने मुक्तीचा प्रश्न तेथे संभवत नाही. जीव मात्र बध्दमुक्त म्हणजे बध्द असूनही मुक्ततेची पात्रता असणारा असा आहे. परमेश्वर नित्यमुक्त असल्याने तोच जीवाला उध्दारू शकतो. परमेश्वराच्या ज्ञानाने वा भक्तीने जीवाला मोक्ष मिळू शकतो. देवता ह्या शुभाशुभ कर्मांची अनित्य फळे देतात. त्या मोक्षदायक नाहीत. शाश्वत आनंद देणाऱ्या

मोक्षासाठी परमेश्वराचीच उपासना करावयास हवी. असे या तत्त्वज्ञानाचे थोडक्यात स्वरूप आहे.

महानुभावांच्या श्रद्धेप्रमाणे परमेश्वर चार युगात हंस, दत्त, कृष्ण व चक्रधर असे चार अवतार घेतो. त्या त्या युगातील देहधारी जीव साकार परमेश्वराच्या सन्निधानाने आपला उध्दार करून घेतात. मात्र जीवाचे उध्दरण म्हणजे काही अद्वैत्यांची सायुज्य मुक्ती नव्हे. मुक्तीनंतरही जीवाचे अस्तित्व टिकून राहते. महानुभावांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे देवताही अनंत आहेत. त्यांच्यातही उच्चनिचपणा आहे. शिवाय त्या नित्यबध्द आहेत. म्हणून जीवापेक्षा त्यांच्या ठिकाणी ज्ञान-आनंद-सामर्थ्य-ऐश्वर्य व प्रकाश यांची समृध्दी विशेष असली तरी त्या "परमेश्वर नव्हेती". परमेश्वराशी व जीवाशी त्या कधीच एकरूप होत नाहीत. देवतांचा स्वतंत्र वर्ग मानणे. हे माहानुभावीय तत्त्वज्ञानाचे वैशिष्टय आहे. पंचमहाभूते व त्रिगुण यांच्यापासून निर्माण झालेली अष्टभैरवास्थित सृष्टी म्हणजे प्रपंच, तो जीव, देवता, परमेश्वर या तिन्हीपासून अगदी वेगळा आहे. कार्यरूप प्रपंच जड व अनित्य असला तरी कारणरूप प्रपंच अनादी-अनंत म्हणूनच नित्य व स्वतंत्र आहे. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर यांच्या परस्परांशी वा सर्वांशी मिळून कधीच ऐक्य होत नाही. हे चारी पदार्थ नित्य नि अनंत आहेत.

पंथाच्या तत्त्वज्ञानात त्या पंथाची विरक्तवृत्ती व जीवनाच्या सर्वच स्वरूपाकडे पाहण्याची सूक्ष्म- दृष्टी आढळते. असे विरागी सूक्ष्म स्वरूपाचे निरीक्षण असल्याने त्यांचे आचारधर्मही तसेच काटेकोर कडक परिणामकारक स्वरूपात अस्तित्त्वात आले.

हा आचारधर्म थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे. साधकाने विकार-विकल्पशून्य होऊन स्वभावाला मात्रा देवून, इतर कुणाचाही आश्रय न घेता

केवळ ईश्वराधीन राहून त्याचे स्मरण करीत आपला जन्म क्षेपावा म्हणजे परमेश्वर त्याला पुन: संबंध देतात. विकार शून्यतेसाठी इंद्रियांचे नियमन आवश्यक आहे. केवळ ज्ञानाने मनुष्य उध्दरत नाही. ज्ञान मिळाल्यानंतरही सर्वसंगपरित्याग करुन ईश्वराला अनुसरले पाहिजे. अशाप्रकारे आचार धर्माचे महत्त्व विशद करुन पुढील स्वरुपाचे आचार सांगितले आहेत. यात सर्वस्वत्यागावर व कष्टावर भर दिला आहे. "स्वदेश संबंधु त्याज्य: स्वग्रामसंबंधु त्याज्य: संबंधियांचा संबंधु तो विशेषत: त्याज्य ।। (आ.१)

"सुखाअेया वेगळे होआवे ।।

"जितेनि मृताचा धर्मी वर्तावे" ।।

एवढी विरक्ती साधकाने अंगी बाणली पाहिजे. तसेच पुढील आचारही लक्षात घेण्यासारखे आहेत.

"ओळखातेयाचेया घरा न वचावे" ।। (आ. ८३)

तोरण मेळाचेया घरा न वचावे ।। (आ. ८४)

"चित्रीचीही स्त्री न पाहावी" (आ. १०)

इंद्रिये विषयाधीन होऊ नयेत म्हणून साधकाने वरील सारे सुखोपभोग वर्ज्य करावेत. आचारधर्मात अहिंसात्मकवृत्तीलाही महानुभावाधर्माच्या विशेष महत्त्व आहे.

"हिंसा न करावी" ।।

"तुमचेनि मुंगी रांड न होआवी" ।।

अशी अहिंसात्मक आचारधर्माची प्रवृत्ती त्यांच्या सूत्रपाठाच्या विविध प्रकरणात वर्णन केलेली आहे. विषयत्याग, ब्रह्मचर्य, वैराग्य, भीक्षाव्रत, ईश्वरस्मरण, अहिंसा, सत्संग, समता, शरणागति, अशा विविध विषयाबाबतचे आचरण विषयक नियम अथवा आचारधर्म सांगितलेले आहे.[६]

महानुभावांच्या या आचार धर्मातून त्यांची जीवन जगण्याची वृत्ती दिसते. परमेश्वरप्राप्ती हीच अंतिम इच्छा गृहीत धरलेली असल्याने त्यांच्या आचारधर्मात आत्यंतिक वैराग्य निर्माण झाले असे शेणोलीकरांनी ह.श्री. ९ नमूद केले ते संयुक्तिकच आहे. वैराग्याला उपयुक्त अशी निवृत्तिविषयक जाणीवही ओघानेच आलेली आहे.

आतापर्यंतच्या विवेचनातून व संदर्भातून महानुभाव संप्रदायाची जडण-घडण कशी होत गेली याचा विचार केला. महानुभावाच्या या जडण-घडणीचा त्यांच्या वाङ्.मयनिर्मितीवर प्रभाव आहे. त्यामुळे त्यातील समाजजीवनाचे चित्रणही असाच स्वरूपाचे आहे. त्यामुळेच महानुभावीयांचे वाङ्.मय, त्याची निर्मिती व त्यामागील प्रेरणा समजावून घेणे आवश्यक ठरते.

## ५) प्राचीन मराठी वाङ्.मयाचे स्वरूप:

प्राचीन मराठी वाङ्.मयाचे दोन भाग अथवा प्रकार आपणास आढळतात. एक गद्य व दुसरा पद्य. प्राचीन मराठीचे क्षेत्र या वाङ्.मय प्रकारांनी व्यापलेले आहे. प्राचीन वाङ्.मयाचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, त्यातील पद्याचाच अधिक विचार झालेला आहे. पद्याच्या मानाने गद्य वाङ्.मयाकडे काही अंशी दुर्लक्षच झालेले आहे. असे असूनही काही अभ्यासकांनी यातील गद्य स्वरूपाकडे लक्ष पुरविले. डॉ. तुळपुळे [८] शं.गो. यांनी या गद्य वाङ्.मयाचा चिकित्सकपणे अभ्यास केला व त्याचे स्वरूपही विशद केले. या गद्याबद्दल ते म्हणतात. "प्राचीन पद्याच्या मानाने या गद्याची उंची कदाचित कमी भरेल, परंतु त्याचा व्याप मोठा असून त्याचे सर्वस्पर्शित्व असाधारण आहे. यात काहीच शंका नाही." डॉ. शं.गो. तुळपुळे यांनी प्राचीन गद्याचे व्यापकत्व व सर्वस्पर्शी स्वरूप ओळखले. हे व्यापकत्व त्यांनी वेगवेगळ्या स्वरूपातून

स्पष्ट केलेले आहे. प्राचीन मराठी गद्य वाङ्मयात, अक्षर-गद्य, महानुभावीय गद्य, मध्ययुगीन गद्य, बखार गद्य व पत्रस्वरूपात्मक गद्य असे प्राचीन गद्याचे स्वरूपही विविध प्रकारचे आहे.

डॉ. तुळपुळे यांनी प्राचीन मराठी गद्याचे स्वरूप व महत्त्व ओळखून त्याचे विवेचन केले आहे. डॉ. वसंत जोशी [६] यांनी प्राचीन वाङ्मयाबद्दल विचार मांडतांना त्यातील विविध प्रकार लक्षात घेऊन सांगितले की, "प्राचीन काळातील महानुभावीय चरित्रे, बखारी व ऐतिहासिक पत्रव्यवहार, एकनाथांचे अर्जदास्त ऐवढेच लेखान गद्यमय स्वरूपाचे आहे. बाकी सर्वच लेखान पद्यमय आहे.

वरील विवेचनातून आपल्या लक्षात असे येते की प्राचीन मराठी वाङ्मयात गद्याचे स्वरूप अल्पसे होते. या गद्यवाङ्मयात महानुभावीय वाङ्मयाचा भरणा अधिक आहे. हे ध्यानात घ्यावे लागते. त्यामुळेच महानुभावीय वाङ्मयाचे स्वरूप लक्षात घेणे अगत्याचे आहे.

## ६) महानुभाव वाङ्मयाचे स्वरूप:

महानुभावीय वाङ्मय श्रध्देच्या व भक्तिभावाच्या माध्यमातून निर्माण झाले. या वाङ्मयाच्या निर्मिती मागे पंथातील श्रेष्ठ व थोर व्यक्तीबद्दल आदराची भावना दिसते. पंथाच्या निर्मितीस व वाढीस कारणीभूत ठरलेल्या विभूतींचे व्यक्तीमत्त्व या वाङ्मयाची मूळ प्रेरणा आहे. विभूतीव्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आल्याने व्यक्तिमत्त्वाचा व पर्यायाने चरित्रात्मक लेखानाचा मार्ग या लेखाकांनी स्विकारला. ही चरित्रे या विभूतींच्या नंतरच्या काळात लिहीली गेली. ती आठवणींच्या स्वरूपातून .। त्यामुळे या वाङ्मयात स्मृतींना महत्त्व प्राप्त झाले. अनेक लेखाक स्थळ माहात्म्य मानणारे होते. जेथे जेथे आदरणीय व्यक्तींनी वास्तव्य केले त्या स्थळांचे महत्त्वही सांगितले गेले. अशा वेगवेगळ्या विचारांनी या पंथातील वाङ्मय निर्माण झालेले

आढळते. या वाङ्मयाची विविध स्वरूपे सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे आढळतात.

अ) चरित्रात्मक लेखन:

महानुभावीय लेखकांना अवतारी पुरुष श्रीचक्रधर स्वामी यांच्याबद्दल आदर होता. त्यांच्या निर्याणानंतर त्यांच्या आठवणी सारख्या येत. तसेच स्वत: चक्रधरांनी "शास्त्र घेइजे, घोकिजे, मग काळेकरुनि उपयोगा जाए:" असे सांगितले होते. त्यास अनुसरुन म्हाइंभटाने इ.स.१२७६ मध्ये सर्वज्ञांच्या लीळाचरित्राची निर्मिती केली. या ग्रंथाची निर्मिती करतांना त्यांना अत्यंत परिश्रम घ्यावे लागले. लीळा-चरित्रा प्रमाणे पुढे त्यांनी श्री गोविंदप्रभूंचे चरित्र सिध्द केले. नरेंद्र व परशराम या दोघांनी मिळून इ.स. १३०८ मध्ये "स्मृतिस्थळाची" रचना केली. त्यात पंथाचे आद्याचार्य नागदेवांचे चरित्र आठवणींच्या रूपाने आले आहे. "लीळाचरित्र","श्री गोविंदप्रभूचरित्र व स्मृतिस्थळ" हे तीनही महत्त्वपूर्ण महानुभावीय ग्रंथ आहेत. त्यात प्रामुख्याने अनुक्रमे श्री चक्रधरस्वामी, श्री गोविंदप्रभू व नागदेवाचार्य यांचे जीवनचित्र स्मृतिरूपाने रंगविलेले आहे. त्या त्या चरित्रनायकाच्या आवडी-निवडी, आचार-विचार, बोलणी-बसणी ही सर्व आठवणींच्या रूपाने सांगणारे हे चरित्र ग्रंथ म्हणजे यादवकालीन गद्याचा आदर्शच होय.[१०] भाषा व भावना या दोनही दृष्टींनी हे चरित्र ग्रंथ श्रेष्ठ आहेत.

या चरित्रात्मक लेखनाची डॉ. वसंत जोशी[११] यांनी मार्मिकतेने चिकित्सा केलेली आहे. "एखादया लेण्यातील शिल्पकृती तेथील पाषाणावर शिल्पकाराने मारलेल्या एक-एक छिन्नीने घडत जाते, तसे या आठवणींचे स्वरूप आहे. श्री गोविंदप्रभू, श्री चक्रधर, व नागदेव या थोर महानुभावीय विभूतींचे जीवनदर्शन व स्मृतितून त्यांच्या गुणदोषांसह प्रकट झाले आहे."

डॉ. व.रा. बोरगावकर[१२] यांनी या चरित्र लेखनाबद्दल म्हटले आहे की, "महानुभावांची चरित्रात्मक लेखनाची प्रक्रिया अधिक निर्दोष दिसते. स्मरणभक्तीच्या सूत्रांमुळे ती निर्दोष होण्याला मदत झाली. संकलन, अन्वय, कालानुक्रम, व्यक्तीच्या - कृती - उक्तींची नोंद, स्थलविशेषांची नोंद इत्यादींना या प्रक्रियेत स्थान मिळाले. अशा विविध स्वरूपातून ही चरित्रे महत्त्वाची ठरलेली आहे. या चरित्रात्मक लेखनाबद्दल भाष्य करतांना डॉ. बोरगावकर पुढे म्हणतात की, "महानुभाव चरित्रात्मक लेखन अल्पजीवी ठरले. कारण पंचकृष्ण व आचार्य यांच्या पुरतीच ती चरित्रे लिहिली गेली." ही चरित्रे अल्पजीवी असली तरी महत्त्वपूर्णच मानावी लागतील. कारण मानवी जीवनाचे व त्यातही प्राचीन मराठी संस्कृतीचे प्रभावीपण त्यात लपलेले आहे. ते येथे लक्षात घेणे गरजेचे ठरते.

ब) सूत्रपाठ:

म्हाइंभट यानी "लीळाचरित्र" लिहून तयार केले. त्यात आलेली श्रीचक्रधरांच्या तोंडची सूत्रमय वाक्ये एकत्र करून त्यातून त्यांचे तत्त्वज्ञान केशिराज पंडिताने सिध्द केले. त्यांनी केलेले चक्रधरांच्या वचनांचे हे संकलन म्हणजेच महानुभावांची सुप्रसिध्द "सूत्रपाठ" होय. तो निरनिराळ्या प्रकरणांत विभागलेला असून त्यातील सूत्र संख्या सुमारे १६०८ इतकी आहे. याशिवाय श्री चक्रधरांनी निरुपणाच्या ओघात तात्त्विक विचार स्पष्ट करण्यासाठी जे लौकीक दृष्टांत किंवा व्यावहारिक दाखले दिले त्यांचाही एक संग्रह याच केशिराजानेच "दृष्टांतपाठ" या नावाने तयार केला. संस्कृत भाषेत "रत्नमालास्तोत्र"ची रचनाही याच पंडिताने केलेली आहे. या सर्व ग्रंथाची निर्मिती लीळाचरित्रातून झालेली असल्याचे आढळून येते. तसेच यातील सर्व तत्त्वज्ञानात्मक स्वरूप "लीळाचरित्रात" आलेले आहे. तरीपण केवळ तत्त्वज्ञानाचे सूत्रविवेचन करणारे ग्रंथ म्हणून या ग्रंथाना पंथीयात

महत्त्वपूर्ण स्थान आहे."

क) टीकात्मक ग्रंथ:

सूत्रपाठाबरोबरच गीता-भागवत याही ग्रंथांना महानुभावीयांनी महत्त्वपूर्ण मानले. त्यामुळे या ग्रंथावरील टीकात्मक स्वरूपाचे लेखनही या पंडित लेखकांनी केले. महिंद्रव्यास, कवीश्वरव्यास, लक्ष्मींद्रभट इत्यादींच्या पंथरावर गीता-टीका उपलब्ध आहेत.[१४] टीका ग्रंथात विश्वनाथ बाळापूरकरांचा "ज्ञानप्रबोध" हा ग्रंथही लक्षणीय आहे. त्यात गीतेच्या १३ अ. ज्ञानलक्षणांवर भाष्य केलेले आहे.

ड) साती (काव्य) ग्रंथ:

एकीकडे चरित्रात्मक, तसेच तत्त्वज्ञान व टीकात्मक ग्रंथांची निर्मिती होत असतांना दुसरे काही प्रतिभावंत आणि प्रज्ञावंत कवी काव्यात्म लेखनात पुढे येत होते. काव्यात्म शैलीमुळे हे लेखन काव्यग्रंथ म्हणून ओळखले जातात. त्यातून या वाङ्मयातील लालित्यपूर्ण लेखनाचे स्वरूपही आपणांपुढे उभे राहते. हे सातीग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत.

१) नरेंद्रकवी: "रुक्मिणी स्वयंवर" (शाके १२१४)
२) भास्करभट: "शिशुपालवध" (शाके १२३०)
३) भास्करभट: "उध्दवगीता" (शाके १२३०)
४) दामोदर पंडीत: "वच्छहरण" (शाके १२३८)
५) नारायण व्यास बहाळिये: ऋध्दिपूरवर्णन (शाके १२५३)
६) रवळोव्यास: सह्याद्रिवर्णन (शाके १२५५)
७) विश्वनाथ बाळापूरकर: ज्ञानप्रबोध (शाके १२५३)

सातीग्रंथ वैशिष्टयपूर्ण आहेत. यातील प्रत्येक ग्रंथाचा विषय वेगवेगळा आहे. पण ते सर्व काव्य व पंडितीस्वरूपाचे असल्याने "सातीग्रंथ"

अशा एकास्वरूपाने ओळखले जातात. या ग्रंथाचे लेखनकर्ते बहुतेक सर्व पंडित कवी व पंथातील मान्यवर असल्यानेही हे ग्रंथ असे एकत्रित स्वरूपात ओळखले जात असले पाहिजे. या सर्वच ग्रंथातील लेखन हे आकर्षक व वाचनीय आहे. लालित्यपूर्ण स्वरूपात लेखन असल्यानेच या ग्रंथांना महत्त्व प्राप्त झालेले दिसते. यातील साहित्यगुणाचे स्वरूप थोडक्यात सांगावयाचे झाल्यास अंतःकरणाचा ओलावा, बुध्दीचा, प्रभाव, कल्पनेच्या भरा-या, भावनेची उत्कटता, पांडित्याचा प्रकर्ष आणि भाषेची प्रौढता, अशाच स्वरूपात अभिव्यक्त करावे लागेल.[१५]

महानुभावीय वाङ्.मयाचा इतका विस्तृत व व्यापक परिचय करून देण्याचे कारण म्हणजे या वाङ्.मयाबद्दल असलेली उदासीनता हे होय. अभ्यासक केवळ "लीळाचरित्र" अथवा "सातीग्रंथ" एवढेच वाङ्.मय लक्षात घेतात. महानुभावीय ग्रंथकारांचे इतर स्वरूपातील वाङ्.मयही भरपूर आहे. उदा. भाष्यग्रंथ, गीताटीका यासारख्या ग्रंथाचाही अभ्यास सूक्ष्मतेने झालेला आहे. अगदी प्रारंभीच्या काळात निर्माण झालेले हे वाङ्.मय असल्याने त्याचे वेगळेपण लक्षात घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

७) महानुभावीय वाङ्.मयाचे वेगळेपण:

आदर व श्रध्दा या दोन प्रेरणातून निर्माण झालेले महानुभावीय वाङ्.मय अनेक दृष्टींनी वैशिष्टयपूर्ण आहे. निर्मिती, मांडणी, लेखन स्वरूप, अशा विविधतेतून या वाङ्.मयाची निर्मिती झालेली असली तरी त्यात खालीलप्रमाणे ठळक स्वरूपातील वेगळेपणा लक्षात आल्याखेरीज राहत नाही.

गद्यस्वरूप: महानुभावीय लेखकांनी अगदी प्रथमपासूनच गद्य लेखनशैली स्विकारली. प्रारंभीच्या अवस्थेतच "गद्य" लेखनाचा आदर्श या साहित्याने

निर्माण केला. गद्यात्मक लेखन हे या वाङ्मयाचे महत्त्वाचे स्वरूप वैशिष्ट्य आहे. या काळात एकीकडे पद्यात्मक लेखन बहारत असतांना महानुभावीय लेखकांनी गद्य लेखन केले व प्राचीन मराठी वाङ्मयाच्या प्रांगणात स्वत:चे वेगळेपण सिध्द केलेले आहे. त्यांच्या गद्य लेखनातून पंथाच्या तत्त्वज्ञानाचे विभूती-व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप समजतेच पण त्याचबरोबर यादवकालीन समाज, सामाजिक परिस्थिती यासारख्या इतरही बाबींचाही ठसा या गद्यातून उमटलेला आहे. आदी प्रारंभावस्थेत मराठी मुलूख कसा होता? मराठी माणूस कसा जगत होता? सर्व सामान्यांचा समाज कसा होता? त्याचे प्रभावी चित्र या गद्यात्म लेखनातून उमटलेले आहे. म्हणून हे सर्व गद्य वाङ्मय आजही तितकेच महत्त्वपूर्ण आहे.

## मराठी भाषेचा स्वीकार:

या साहित्यातून दिसून येणारा मराठी भाषेविषयीचा अपूर्व अभिमान हे या साहित्य लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. पुढे ज्ञानेश्वर एकनाथा-सारख्या संतांनी मराठी भाषेचा कैवार घेऊन तिचा पुरस्कारही केला. तथापि महानुभाव पंथातील पंडितांनी व कवींनी मराठी भाषेबद्दल जी आत्मियता दाखविली ती अपूर्वच म्हणावी लागेल. या लेखकांनी व पंडितांनी मराठी भाषेबद्दल सार्थ अभिमान होता. संस्कृतमध्ये रचना करण्याची इच्छा एकदा केशिराजांनी नागदेवाचार्यांजवळ व्यक्त केली. त्यावेळी नागदेवाचार्यांनी त्यांना त्या विचारापासून परावृत्त करतांना म्हटले. "नको गा केशवद्द्या: येणे माझिया स्वामीच्या म्हातारीया नागवतील:"[१६] तसेच एकदा केशिराजांनी त्यांना संस्कृत भाषेत काही प्रश्न विचारले, त्यावर नागदेवाचार्य म्हणाले, "पंडित केशवद्या: तुमचा "अस्मात कस्मात" मी नेणे गा: मज श्री चक्रधरे निरूपिली मऱ्हाठी: तियाची पुसा:"[१७] वरील दोन्हीही उद्गारातून मराठी भाषेबद्दलची व तसेच मराठी माणसांबद्दलची तळमळ

व्यक्त होते. या साहित्याने मराठी भाषेला अलौकिक महत्त्व प्राप्त करुन दिले. कारण १२व्या शतकात संस्कृतचा फार मोठा प्रभाव तत्कालीन समाजावर आणि साहित्यावरही होता. असा प्रभाव असतांनाही या लेखकांनी मराठीचा स्विकार केला. आजच्या काळातही या मराठीस एका वेगळया स्वरुपात महत्त्व आहे. ते असे की, अव्वल दर्जाचे मराठी शब्द-भांडार आपणांस याच साहित्यात आढळते. आजच्या समाजात शिक्षणाच्या प्रसारामुळे इंग्रजी सारखी परभाषा व ती मधील शब्द मराठीत रुढ झालेले आहे. त्यांना पर्यायी मराठी शोधतांना या साहित्यातील मराठी भाषेचा व शब्दांचा निश्चितच उपयोग होऊ शकेल.

या दोन ठळक वैशिष्टयाप्रमाणेच या वाङ्मयाची इतर अनेक वैशिष्टये आढळून येतात. याचे दुसरे महत्त्वपूर्ण स्वरुप म्हणजे या साहित्यात आढळणारी विविधता हे होय. चरित्र - टीका - काव्य - तत्त्वज्ञानात्मक लेखन अशी विविध दालने या साहित्याने सजविली. पद्यापेक्षा गद्यात्मक लेखन करुन या विविधतेत लेखकांनी भर घातली आहे. मराठी भाषा पांडित्याच्या व शास्त्रविवेचनाच्या बाबतीत संस्कृतच्या रेसभरही मागे राहू नये या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन महानुभाव विद्वानांनी हा विविध ग्रंथरचनेचा उद्योग केला. त्यास मराठी भाषेत महत्त्वाचेच स्थान द्यावे लागते. अलौकिक स्वरुप म्हणूनच या निर्मितीचा स्विकार करावा लागतो.

महानुभावीय वाङ्मयाचे वेगळेपण व महत्त्व हे वरील विवेचनावरुन स्पष्ट होते. तसेच या वाङ्मयाला प्राचीन मराठी साहित्यात महत्त्व का प्राप्त झाले हे ही समजून येते. गद्यात्मक लेखन, "मराठीभाषेचा स्विकार, विविधतापूर्ण लेखनाविष्कार, लालित्यमयता अशा विविध कारणांनी महानुभावीय वाङ्मयाने प्राचीन मराठी वाङ्मयात स्वत:चा वेगळेपणा सिध्द केलेला आहे. त्यामुळेच त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तसेच

या वाङ्.मयाला आणखी एका कारणामुळे महत्त्वपूर्ण मानावे लागते, ते म्हणजे संस्कृत वाङ्.मयाशी बरोबरी करणारे, किमान त्यापातळीपर्यंत पोहचणारे असे हे साहित्य आहे.

अशा विविध स्वरुपातून महानुभावीय साहित्याची निर्मिती झालेली आढळते. या साहित्याचे वेगळेपण त्याच्या गद्य स्वरुपामुळे उठून दिसते. या गद्यात्म लेखनाला प्राचीन मराठी वाङ्.मयात तरी तोड नाही. त्यातून असे पंथाचे स्वरुप, श्रेष्ठ व्यक्तींचे चरित्र आढळते. तसेच या वाङ्.मयातून तत्कालीन सामाजिकतेचे, मराठी मुलुखाचे स्वरुप आपणास समजून येण्यास मदत होते.

आतापर्यंतच्या विवेचनात आपण महानुभावीय पंथाची निर्मिती कशी झाली. या पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी यांचे जीवन चरित्र व पंथाचे तत्त्वज्ञान मर्यादित स्वरुपाच्या कक्षेमुळे थोडक्यात समजावून घेतले. महानुभावीय वाङ्.मयाचे स्वरुपही पाहिले. तसेच या वाङ्.मयाचे वेगळेपण लक्षात घेतले. मराठीचा प्रारंभीचा काळ असूनही या पंडितांनी, लेखकांनी विविध लेखन प्रकार हाताळलेले आहेत. महानुभाव साहित्य म्हणजे लीळाचरित्र, सातीग्रंथ ए एवढेच ठराविक ग्रंथ लक्षात घेतले जातात. खरे या वाङ्.मयातील टीकात्मक भाष्यग्रंथाचा यातील काहींवर अभ्यास संशोधन होतेय. आजच्या वाचणाऱ्या मराठी समीक्षेला व टीकादृष्टीला त्यातूनच कदाचित नवी वाट सापडेल. पण याकडे लक्ष पाहिजे. असे टीकेबाबत तसेच मराठी भाषेबाबतही म्हणता येईल. आज मराठातील कितीतरी शब्दांचा वापर कमी झाला आहे. त्यांच्या जागी हिंदी अथवा इंग्रजी शब्द आढळतात. मराठीतील अव्वल स्वरुपाचे खास मराठमोळी वळणाचे देशी शब्द आपणास या वाङ्.मयात आढळून येतात. या शब्दाचे स्वरुप व त्यांचे सामाजिक स्तरावर होणारे उपयोजन लक्षात घेणे अगत्याचे आहे. या साठी या साहित्यातील सामाजिकतेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

तत्कालीन समाज जीवनातील वेगवेगळे स्तर व त्यांचे स्वरूप, त्यांचे आविष्कार, तत्कालीन रूढी-परंपरा, माणसांची नाती-गोती व कौटुंबिकतेचे स्वरूप समजावून घेणे ही मोलाचे आहे. या दृष्टीने अभ्यासक आता या वाङ्.-मयातील ग्रंथाकडे वळले आहेत. याची कारणेही अनेक आहेत, महानुभाव साहित्य हे पंथीय स्वरूपातून निर्माण झालेले आहे. त्यातून केवळ पंथाबद्दलची, त्याच्या तत्त्वज्ञानाची, त्या पंथातील अवतारी पुरुषांची वर्णने येवढेच स्वरूप लक्षात घेतले गेले. वारकरी संतांच्या साहित्यातील अभंग ओव्यांचे अवलोकन हे जसे केवळ भक्तीच्या स्वरूपातून अभ्यासले गेले, सांप्रदायिक स्वरूपातून अभ्यासले त्याचप्रमाणे महानुभावीय वाङ्.मयाचा अभ्यास हा एक धार्मिक संप्रदाय याच भावनेतून केला गेला. त्यामुळे या वाङ्.मयाचे जे वेगवेगळे विविधांगी आविष्कार निर्माण झाले आहेत. महानुभाव पंथ व वाङ्.मय याकडे एका विशिष्ट दृष्टीकोनातून पाहिले गेले. यामुळे या साहित्याचे वेगळेपण पूर्णत्वाने लक्षात घेतले गेले नाही.

प्रस्तुतच्या शोधनिबंधात त्यामुळेच सामाजिकतेची दृष्टी ठेवून "स्मृतिस्थळ" व दृष्टांतपाठ यांचा अभ्यास करण्याचे आयोजिले आहे. या वाङ्.मयातील सामाजिक स्वरूपाला महत्त्व असल्याने समाजजीवनाचे अवलोकन हे साध्य मानले आहे. त्या विषयाकडे वळण्यापूर्वी साहित्य व समाज यांचा परस्पर संबंध लक्षात घेणे प्रस्तुत ठरते. म्हणून पुढील प्रकरणात या विषयाचे सविस्तर विवेचन केलेले आहे.

.......

## प्रकरण पहिले

## संदर्भ ग्रंथ


| | |
|---|---|
| १) शेणोलीकर ह.श्री. | प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप<br>आ. ५ वी, पृ. १२, १३. |
| २) सहस्त्रबुद्धे पु.ग. | महाराष्ट्र संस्कृती,<br>आ. १ली, पृ. ३४३. |
| ३) डॉ. तुळपुळे शं. गो. | महानुभाव गद्य-प्रस्तावना<br>आ. १ली, पृ. ११. |
| ४) डॉ. कोलते वि. भि. | लीळाचरित्र - प्रस्तावना<br>आ. १ली, पृ. ९७. |
| ५) डॉ. ढेरे रा.चि. | चक्रपाणि<br>आ. १ली, पृ. ६८, ६९. |
| ६) डॉ. तुळपुळे शं. गो. | महानुभाव गद्य<br>आ. १ली, पृ. ४८, ४९. |
| ७) शेणोलीकर ह.श्री. | उ. नि. पृ. २१ |
| ८) डॉ. तुळपुळे शं. गो. | प्राचीन मराठी गद्य - प्रस्तावना<br>आ. २री, पृ. १. |
| ९) डॉ. जोशी वसंत | महानुभाव संत<br>आ. १ली, पृ. ५. |

| | |
|---|---|
| १०) डॉ. कुळकर्णी शं. गो. | प्राचीन मराठी गद्य – प्रस्तावना<br>आ. २री, पृ. ३. |
| ११) डॉ. जोशी वसंत | महानुभाव संत<br>आ. १ली, पृ. ६, ७. |
| १२) बोरगावकर व.रा. | प्राचीन मराठीतील चरित्रलेखन<br>आ. १ली, पृ. ११९, १२०. |
| १३) शेणोलीकर ह.श्री. | प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप<br>आ. ५वी, पृ. ३२, ३३. |
| १४) शेणोलीकर ह.श्री. | उ.नि. पृ. ३५. |
| १५) शेणोलीकर ह.श्री. | उ.नि. पृ. ४१. |
| १६) देशपांडे वा.ना. | स्मृतिस्थळ स्मृ. क्र. १५<br>आ. ३री, पृ. ७. |
| १७) देशपांडे वा.ना. | उ.नि. स्मृ. क्र. ६६,<br>आ. ३री, पृ. २१. |

.........